# जिल्हा परिषद, नाशिक

## बांधकाम विभाग क्रमांक १,

दुरध्वनी .०२५३-२५९२५७० , ई-मेल : bnc१nsk@gmail.com

जा.क्रं. . जिपना/इवद-1/निविदा/जि.प.इमारत/ १७० /२०२०                दिनांक :- ३०/१२/२०२०.

**डाक नोंद देय पत्र**

प्रति,
मे. क्रांती कंन्स्ट्रक्शन.
( प्रो. प्रा. अभिजीत नंदकुमार बनकर )
योगानंद अपार्टमेंट, मालपाणी हॉस्पीटलजवळ.
विसेमळा, कॉलेज रोड नाशिक-४२२ ००५.
फोन नं. - ०२५३-२५९९७१७, ९८५०९८९७१७
ई मेल - kranticonst@gmail.com

## का र्या दे श

खालील दर्शविलेल्या कामाची निविदा आपले मक्तेदार संस्थेच्या नावावर जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिंनाक ११/१२/२०२० मधील विषय क्रं. ५६ अन्वये मंजूर केली आहे. त्यानुसार आपण निविदा खंड १ अटी व शर्तींचे १६.२ नुसार अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम रु. ३,२४,०३,३४३/- ची एच.डी.एफ.सी. बँक, बोधले नगर नाशिक पुना रोड नाशिक ची बँक प्रतिभूती हमी क्रं. 064GT02203390001 दिनांक ०४/१२/२०२० या कार्यालयात सादर केली आहे. तसेच निविदा शर्त क्रं. ३४.१ अन्वये प्रारंभिक अनामत रक्कम रुपये १६,२०,०००/- ची मुदतठेव पावती एचडीएफसी बँक, शरणपुर रोड, नाशिक ची सादर केलेली आहे. याशिवाय करारनामा करणेस्तव रु. १६१०००/- चे ईएसबीटीआर व रु. ५००/- चा मुंद्राक सादर केलेला आहे.

यावरुन तुम्हांस कळविण्यात येते की, तुम्ही खालील दर्शविलेले काम मंजूर **ब-२** निविदाप्रमाणे सुरुवात करावी. उप अभियंता (इ व द) व त्यांचे प्रतिनिधी जि.प.उपविभाग ता. नाशिक जि.प.नाशिक यांस सदर कामाची देखरेख करण्याचे अधिकार दिलेले आहेत. काम दिनांक- २८/१२/२०२२ च्या आत पुर्ण झाले पाहिजे. या कामाचा दोष निवारण कालावधी अंतिम देयक अदा झालेच्या दिनांकापासुन ५ वर्षे इतका आहे. कामावर हजर राहणाऱ्या अधिकृत तांत्रिक कर्मचा-यांची ( स्थापत्य अभियंता ) व्यक्तिचे नाव या कार्यालयास कळविण्यात यावे. याबाबतचा सर्व पत्रव्यवहार संबंधीत उप अभियंता यांच्या मार्फत करावा.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचा अंदाजपत्रकीय रक्कम | निविदेचा दर % कमी/अधिक | स्वीकृत निविदा रक्कम | कामाची मुदत निविदा सुचने प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | **जिल्हा परिषद, नाशिक नविन प्रशासकिय इमारत बांधकाम करणे. ता. जि. नाशिक टेंडर आय डी क्र. २०२०_NASHI_६०३३३१_१ कामाचे देयकातुन ४ % सुरक्षा अनामत रक्कम वजावट करण्यात यावी.** | रु. २०,२५,२०,८९१/- | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-)२०.०१ कमी दराने** | रु. १६,१९,९६,४४१/- | **२४ महिने ( पावसाळयासह )** |

**अटी व शर्ती :-**

१) सदर चे काम आपण स्वत:च केले असल्याबाबतचे आवश्यक कागदपत्रे मागणी केल्यास सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

२) १ % कामगार कल्याण उपकर प्रथम बिलातून कपात करण्यात यावा.

३) करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे कंत्राटदाराने शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य यांच्याकडे कंत्राटी कामाचा व त्यांच्याकडे काम करणाऱ्या नियुक्त केलेल्या कामगाराचा विमा उतरविणे अनिवार्य राहिल.अन्यथा कामाच्या पहिल्या धावत्या देयकातुन निविदा रक्कमेच्या १ टक्का रक्कम वुसल करुन शासकिय विमा निधीकडे वर्ग करणेत येईल.

Scanned by CamScanner

४) अधिकृत केलेले कंत्राकदाराकडून GST नोंदणी प्रमाणपत्र देयका वेळी सादर करणे आवश्यक आहे. GST १२ % दराप्रमाणे अदा करण्यात येईल
५) काम मुदतीत पूर्ण न झाल्यास ( भौतिक उदिदष्टानुसार ) निविदा खंड ३ चे १७.१ मध्ये दर्शविलेल्या प्रतिदिन दंड आकारणी करण्यात येईल.
६) Standred Bid Document ( SBD ) मधील निविदा अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.
७) कामाचा वर्क प्रोग्राम माईलस्टोन प्रमाणे विहित नमुन्यात कार्यारंभ आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसाच्या आत सादर करावा व त्यास कार्यकारी अभियंता यांची मान्यता घेण्यात यावी.
८) सदर कामावर लागणा-या बांधकाम साहित्याची तपासणी करणेकामी क्षेत्रिय प्रयोगशाळा स्थापन करावी. प्रयोगशाळा निविदेत उल्लेख केल्याप्रमाणे सर्व साहित्य ठेवण्यात यावे. प्रयोगशाळेमध्ये निरिक्षण अधिका-यांची बैठकीची व्यवस्था करावी. निविदेत नमुद केलेनुसार सार्वजनिक बांधकाम /प्रधानमंत्री ग्रामसडक योजना या प्रयोगशाळा व प्रत्यक्ष कामावरील क्षेत्रिय प्रयोगशाळा यांच्या तपासणी अहवालाचे प्रमाणनुसार ( वारंवारीताप्रमाणे ) चाचणी घेणे बंधनकारक राहिल.
९) कामाचे अस्तित्वातील लेव्हल्स घेतले नंतरच कामास सुरुवात करावी. कामाचे आखणीच्या खुणा कायम राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करावी. संयुक्त मोजणीनंतर फिल्ड बुकवर आपला अधिकृत तांत्रिक प्रतिनिधी व संबधीत उपअभियंता यांची संयुक्तरित्या स्वाक्षरी झाल्यानंतरच काम सुरु करावे.
१०) कामातील बार्बीचे परिमाण, निविदेतील मंजुर परिमाणाच्या सिमीत ठेवावे. सक्षम प्राधिकरणाच्या पुर्व मान्यतेशिवाय मंजुर परिमाणापेक्षा जास्तीचे काम करण्यात येऊ नये.
११) निविदेत नमुद केलेप्रमाणे वृक्ष लागवड करणे बंधनकारक राहिल.
१२) सदर कामासाठी भाववाढ फरक अनुज्ञेय नाही.
१३) नाशिक महानगर पालिकेने मंजुर केलेल्या आराखडयानुसार कामाची आखणी जिल्हा परिषदेच्या पॅनलवरील नेमुणक दिलेले वास्तुविशारद श्री. सुशांत पाटील, नाशिक यांचे मार्गदर्शना खाली करावी.
१४) या कामासाठी वापरण्यात येणारे संकल्पचित्र मा. अधीक्षक अभियंता, संकल्पचित्र कोकणभवन नवी मुंबई यांनी मान्यता दिलेनुसारच वापरणेत यावेत.
१५) निधी उपलब्ध झाल्यानंतर कामाची तपासणी करुन देयक अदा करणेत यईल.
१६) आपला पत्र व्यवहार kranticonst@gmail.com हा ई मेल पत्ता आहे. त्यामध्ये काही बदल झाल्यास या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे. या कार्यालयाकडील यापुढील सर्व पत्रव्यवहार हा ई-मेल व्दारेच करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रशासकिय मान्यता :- ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रं. जिपई-२०१८/प्र.क्र.६४/बांधकाम-४, दिं. ०८/०२/२०१९.

तांत्रिक मान्यता :- म. मुख्य अभियंता, सा.बा.प्रादेशिक विभाग नाशिक यांचेकडील आदेश क्रं. का-३ /इमा /नाशिक / ३०९१ /२०१९, दिनांक १३/०६/२०१९.

**लेखाशिर्ष-** :- २५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, १०१ पंचायत राज, ३१ सहाय्यक अनुदाने ( ०१ ) ( ०३ ) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने ( २५१५ ००५३ )

**सोवत- निविदा खंड १**

**कार्यकारी अभियंता (इवद क्रं. १ )**
**जिल्हा परिषद नाशिक**

२१/०१/2020
**अतिरिक्त ~~मुख्य कार्यकारी~~ अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रत -मा. अध्यक्ष, जि.प. नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- मा. उपाध्यक्ष, जि.प. नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- मा. सभापती,-------------- विषय समिती, जि.प. नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नाशिक ( वैय. कार्यालय ) यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- मा. अतिरिक्त कार्यकारी अधिकारी, जि. प. नाशिक ( वैय. कार्यालय ) यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि. प. नाशिक यांना माहितीस्तव सादर.
प्रत :- म. उप अभियंता (इवद) जि.प.उपविभाग नाशिक
२/- निविदेत नमुद विहित मानकानुसार व कामांस मंजुर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
प्रत :- श्री. सुशांत पाटील, वास्तुविशारद, इंदिरानगर नाशिक.
प्रत - या कार्यालयाची नियोजन / प्रकल्प शाखा / ज्ञापन नस्ती

स्वाक्षरित/xxx
**कार्यकारी अभियंता (इवद क्रं. १ )**
**जिल्हा परिषद नाशिक**

स्वाक्षरित/-xxx
**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

Scanned by CamScanner